Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- XI | ISSUE- VI | JUNE | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# पर्यावरण स्नेही मंडळाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**डॉ. खजूरकर दे. त्र्यं.**
श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन,
धाराशिव.
ई-मेल: khajurkar.devdatt26@gmail.com


**सारांश :**

*विशिष्ट ध्येय व उद्दिष्ट पूर्ततेसाठी अभ्यासक्रमात अध्यापन विषयांसोबत प्रात्यक्षिक भागाचा समावेश केलेला असतो. अभ्यासक्रमास अधिक जिवंत बनविण्यासाठी शालेय उपक्रमांसोबत सहशालेय कार्यक्रमांची जोड दिली जाते. शालेय व सहशालेय उपक्रमांमधूनच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा बहुआयामी विकास साधण्याचा प्रयत्न शाळा महाविद्यालयांच्या माध्यमातून केला जातो. त्यातीलच एक भाग म्हणजे विविध विषयाची मंडळ बी.एडच्या छात्राध्यापकांना या मंडळांमार्फत कसे कार्य करावे याची माहिती होण्यासाठी व मंडळांमार्फत कार्य करण्याचा अनुभव येण्यासाठी प्रशिक्षण महाविद्यालयात विविध मंडळांची स्थापना केली जाते. पर्यावरण मंडळाची आवश्यकता कितपत आहे? पर्यावरण मंडळाची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी सदर संशोधन कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे.*

**प्रस्तावना :**

अभ्यासक्रम राबविताना केवळ चार भिंतीत अध्ययन अध्यापनाचा अनुभव देऊन कार्य संपत नाही तर विद्यार्थ्यांना विविध अध्ययन अनुभव देऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रयत्न केला जातो.. ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणक कक्ष इत्यादी ठिकाणाहून प्रत्यक्ष अनुभव दिले जातात परंतु सहली, क्षेत्रभेटी, प्रदर्शने, सांस्कृतिक कार्यक्रम, इत्यादी सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी जोपासल्या जातात. यातलाच एक घटक म्हणजे विविध विषयांचे अभ्यास मंडळी होत.. अभ्यास मंडळातून विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान, संबंधित मूल्ये रुजविता येतात. अशा विविध मंडळांच्या उपक्रमातून नेतृत्वगुणांचा, संभाषण व अन्य घटकांचा विकास साधला जातो.

बी.एड. अभ्यासक्रमात विविध शाखेचे व विषयांच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश असतात. त्यांच्या अध्यापन पद्धतीनुसार विविध विषयांचे मंडळे स्थापन केलेली असतात ती पुढील आकृतीद्वारे दर्शविण्यात आली आहेत.



**पर्यावरण स्नेही मंडळ:**

बीएड अभ्यासक्रमात पर्यावरण शिक्षण हा एक ऐच्छिक अभ्यास विषय आहे. या विषयाशी संबंधित पर्यावरण मंडळ महाविद्यालयातून स्थापन केले जाते. संशोधकाच्या महाविद्यालयातही सदर मंडळ कार्यरत आहे. पर्यावरणाचा केवळ तात्विक स्वरूपातील ज्ञान न घेता उपक्रमाद्वारे पर्यावरण रक्षणाची जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी सदर मंडळ कार्य करते. या मंडळाची आवश्यकता कितपत आहे? हे पाहण्यासाठी सदर संशोधन कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन शीर्षक:**

पर्यावरण स्नेही मंडळाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**उद्दिष्ट:**

1. पर्यावरण मंडळाच्या कार्यक्रमांमधून छात्राध्यापकांमध्ये रुजविला जाणाऱ्या मूल्यांचा अभ्यास करणे.
2. पर्यावरण स्नेही मंडळाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

**गृहीतक:**

1.पर्यावरण स्नेही मंडळांमार्फत पर्यावरण पूरक मूल्यांची रुजणूक केली जाते.

2.पर्यावरण स्नेही मंडळामार्फत विविध पर्यावरण पूरक उपक्रम राबवले जातात.

**संशोधना कार्याची व्याप्ती :**

1. प्रस्तुत संशोधन कार्य धाराशिव शहरातील श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, धाराशिव या महाविद्यालयाशी संबंधित आहे.
2. संशोधन कार्य हे बी.एड. छात्र-अध्यापकांशी संबंधित आहे.

**संशोधना कार्याच्या मर्यादा :**

1. श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, धाराशिव या महाविद्यालया व्यतिरिक्त अन्य कोणत्याही महाविद्यालयाचा संशोधन कार्याकरिता विचार केलेला नाही.

2.प्रस्तुत संशोधन कार्य हे पर्यावरण स्नेही मंडळा पुरतेच मर्यादित आहे.

**नमुना निवड:**

श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, धाराशिव या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष 2023-24 मधील प्रथम वर्षांच्या सर्व 48 छात्रा-अध्यापकांची निवड करण्यात आली आहे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधन हे वर्तमानकालीन समस्येची संबंधित असल्याने वर्णनात्मक संशोधनातील शालेय सर्वेक्षण या संशोधन पद्धतीचा वापर यासाठी करण्यात आला आहे.

**संशोधनाची साधने :**

माहितीचे संकलन करण्याकरिता प्रश्नावली व पडताळा सूची या साधनांचा वापर सदर संशोधन कार्यासाठी करण्यात आला आहे.

**संशोधन कार्यपद्धती :**

सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. यासाठी श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, या बी.एड. महाविद्यालयातील 48 छात्र अध्यापकांना प्रश्नावलीचे व पडताळा सूचीचे वितरण करण्यात आले. त्यातील 40 छात्र अध्यापकांचा प्रतिसाद मिळाला. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन केले. टक्केवारी या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर करून शेवटी निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात आल्या आहेत. काही महत्त्वाच्या निष्कर्षांवर उपाय सुचवण्याचा प्रयत्न केला आहे.

**पडताळा सूचीमार्फत मिळालेली माहिती चे विश्लेषण**

शैक्षणिक वर्ष 2023 24 मध्ये घेण्यात आलेल्या विविध उपक्रमातून साध्य करावयाच्या अपेक्षित मूल्यांचा विचार पडताळा सूचीमार्फत जाणून घेण्यात आला त्या मार्फत मिळालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे सारणीत दिलेले आहेत.

| अ. क्र. | राबविलेले उपक्रम | साध्य होणारी मूल्ये |
|---|---|---|
| 1 | पर्यावरण पूरक गणेश उत्सव कार्यशाळा | उपक्रमशीलता, सांस्कृतिक पर्यावरणाची जपणूक |
| 2 | पर्यावरण पूरक दीपावली व्याख्यान व सर्व्हेक्षण | संघभावना, सांस्कृतिक पर्यावरणाची जपणूक |
| 3 | पर्यावरण पूरक रंगपंचमी उत्सव | आरोग्य |
| 4 | वृक्षारोपण कार्यक्रम | परस्परावलंबन, निसर्गप्रेम |

| | | |
|---|---|---|
| 5 | कापडी पिशव्यांचा वापर | कार्यकुशलता, प्लास्टिकच्या अनावशक वापर टाळणे |
| 6 | युनिसेफ ऑनलाइन कार्यशाळा | नैसर्गिक संसाधनांचा जपून वापर करणे |
| 7 | व्हाय वेस्ट ॲपचा वापर | पाणीबचत |
| 8 | पशुपक्ष्यांसाठी चारा व पाणी | दयाळू वृत्ती |
| 9 | सायकलचा वापर | श्रमप्रतिष्ठा, इंधन बचत |

**निष्कर्ष :**

1. पर्यावरण स्नेही मंडळाच्या उपक्रमातून संघभावना, निसर्गप्रेम, नैसर्गिक संसाधनांचा काटकसरीने वापर, श्रम प्रतिष्ठा,भूतदया यासारख्या पर्यावरण पूरक मूल्यांची रुजवणूक केली जाते असे बहुतांशी छात्राध्यापकांचे म्हणणे आहे.
2. युनिसेफ मार्फत घेण्यात येणाऱ्या 4 ऑनलाईन अभ्यासक्रमापैकी दोन अभ्यासक्रम पूर्ण करणारे सर्वच छात्राध्यापक आहेत.
3. व्हाय वेस्ट ॲप द्वारे पाण्याचा काळजीपूर्वक वापर करणारे छात्राध्यापक अत्यल्प आहेत.
4. महाविद्यालयात पर्यावरण विषयक पोस्टर स्पर्धेत सहभाग घेणारे क्षेत्राध्यपक संख्येने कमी आहेत.
5. महाविद्यालयात मार्फत पर्यावरण विषयक रांगोळी स्पर्धेत सहभाग घेतलेल्या क्षेत्राध्यापकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. विद्यार्थिनींची संख्या अधिक असल्याने या स्पर्धेत प्रतिसाद चांगला मिळाला आहे.
6. क्लिप/ फिल्म निर्मिती स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यल्प आहे.
7. पर्यावरण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या कार्यशाळांमधून छत्राध्यापकांच्या उपस्थितीचे प्रमाण निम्म्याहून अधिक आहे.
8. प्राण्यांसाठी व पक्षांसाठी उन्हाळ्यात पाणपोईची सोय हा उपक्रम सर्वाधिक आवडला असे म्हणणाऱ्या छात्र अध्यापकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. दुसरा पसंती क्रम पर्यावरण पूरक दीपावली या उपक्रमास मिळालेला आहे.
9. विविध उपक्रमांचा पर्यावरण शिक्षण अभ्यासक्रमात उपयोग होतो असे बहुमत आहे.
10. 'माझा पर्यावरण विषयक संकल्प' यामध्ये अन्नाचा अपव्य टाळणे, प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळणे, वृक्ष संवर्धन करणे इत्यादी संकल्पना प्राधान्याने पसंती क्रम मिळाल्याचे दिसते.
11. भावी शिक्षक म्हणून पर्यावरण मंडळाचे कार्य कसे चालते याविषयीची माहिती मिळते असे बहुतांशी छात्र अध्यापकांचे म्हणणे आहे
12. शालेय विद्यार्थ्यांना प्रेरित करून, मार्गदर्शन देऊन त्यांचा विविध उपक्रमातील सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करावे लागतो हे मंडळाचे कार्य करताना समजले असे छात्र अध्यापकांचे म्हणणे आहे.
13. विषय सहजतेने व रंजकतेने अभ्यासताना पर्यावरण मंडळाचा व त्यातील उपक्रमां चा उपयोग होतो असे बहुतांशी छात्राध्यापकांचे म्हणणे आहे.
14. पर्यावरण विषयक मूल्ये रुजविण्यासाठी पर्यावरण मंडळाचे कार्य अत्यंत उपयुक्त आहे असे बहुतांशी छात्र-अध्यापकांचेमत आहे
15. स्वतः आधी पर्यावरण संरक्षक व संवर्धक म्हणून भूमिका दृढ करण्यासाठी पर्यावरण स्नेही मंडळ परिणामकारक ठरते असे सर्वच छात्राध्यापक म्हणतात.

**शिफारशी :**

1. वैयक्तिक, सामाजिक व नैतिक मूल्यांच्या रुजवणीतीसाठी पर्यावरण स्नेही मंडळांसारख्या विविध मंडळांची स्थापना महाविद्यालयाने करावी .याद्वारे छात्र अध्यापकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधण्यास मदत होते.
2. छात्राध्यापकांनी युनिसेफ मार्फत घेण्यात येणाऱ्या ऑनलाइन अभ्यासक्रमास सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवून चारही अभ्यासक्रम पूर्ण करावे.यातून पर्यावरण संरक्षण विषयक जाणीव अधिक दृढ होईल. अन्य महाविद्यालयांनी देखील याचा विचार करावा व विद्यार्थ्यांना पर्यावरण मंडळाचे सदस्य बनवावे.
3. व्हाय वेस्ट मोबाईल मध्ये डाऊनलोड करून त्याचा नियमित वापर छात्र अध्यापकाने करावा यामुळे त्यांना पाणी बचतीची सवय लागेल.
4. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमात स्पर्धेत छात्र अध्यापकांनी अधिक संख्येने प्रतिसाद द्यावा.

5.छात्र अध्यापकांनी पर्यावरण विषयक आयोजित कार्यशाळांना अधिक संख्येने उपस्थित राहावे जेणेकरून

भावी शिक्षक म्हणून कार्यशाळेचे नियोजन आयोजन व अंमलबजावणी यात सर्वांची माहिती मिळण्यास मदत होते.

6. पर्यावरण स्नेही मंडळामार्फत घेण्यात आलेल्या उपक्रमांचा छात्राध्यापकांना भावी शिक्षक म्हणून कार्य करताना उपयोग होतो. परीक्षेत विचारलेल्या उपयोजनात्मक प्रश्नाचे लेखन करताना उपयोग होतो.
7. अभ्यासपूर्वक सहशालेय उपक्रम म्हणून पर्यावरण मंडळ परिणामकारक ठरते. महाविद्यालयाच्या नॅक मूल्यांकना मध्ये याचा समावेश असल्याने महाविद्यालयालाही त्याचा फायदा मिळतो. याकरिता प्रत्येक बी.एड. महाविद्यालयाने पर्यावरण मंडळ स्थापन करावे.

**संदर्भ:**


1. पाटील गौरी (2016): **विज्ञान आशय युक्त अध्यापन पद्धती (भाग 2)** जळगाव :प्रशांत पब्लिकेशन
2. भिलेगावकर आणि डॉ. मोरे: **शिक्षक शिक्षण** ; पुणे: नित्य नूतन प्रकाशन .
3. भिंताडे वि.रा.: **शैक्षणिक संशोधन** ;पुणे: नित्य नूतन प्रकाशन.
4. निकम जयदीप संपादक (2015),:**पर्यावरण अभ्यास**; नाशिक:यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
5. https://www.skit.ac.in/techno-incubation-centre/universal-human-values-uhv.html
6. https://www.valuestransform.org/en/value-educare
7. https://en.wikipedia.org/wiki/Theory_of_basic_human_values